ePaper

## सौदीत आणखी एका भारतीय नागरिकाचा मृत्यू; मृतांचा आकडा 6 वर



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 22 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




पुणे विमानतळावरून ५० हजार टनांहून अधिक मालवाहतूक

## पंतप्रधान मोदींची इराण राष्ट्राध्यक्षांशी चर्चा; संवादातून तोडगा काढण्यावर भारताचा भर

# पंतप्रधान मोदींचा इराणच्या राष्ट्राध्यक्षांना फोन..!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

पश्चिम आशियामध्ये इस्रायल, अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव शिगेला पोहोचला असताना, भारताने या वादात शांतता प्रस्थापित करण्यासाठी मोठे राजनैतिक पाऊल उचलले आहे. पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांनी शनिवारी इराणचे राष्ट्राध्यक्ष डॉ. मसूद पेजेश्कियन यांच्याशी फोनवरून सविस्तर चर्चा केली. गेल्या आठ दिवसांतील या दोन्ही नेत्यांमधील ही दुसरी चर्चा असून, भारताने या प्रदेशातील शांतता आणि स्थिरतेसाठी पुन्हा एकदा आग्रही भूमिका मांडली आहे.

### शुभेच्छांसोबतच सुरक्षेवर चर्चा

पंतप्रधान मोदींनी राष्ट्राध्यक्ष पेजेश्कियन यांना ईद-उल-फितर आणि इराणचे नवीन वर्ष नवरोज निमित्त शुभेच्छा दिल्या. "हा सण पश्चिम आशियात शांतता, स्थिरता आणि समृद्धी घेऊन येईल," अशी आशा पंतप्रधान मोदींनी यावेळी व्यक्त केली. या शुभेच्छांसोबत पंतप्रधान मोदींनी पश्चिम आशियात बिघडत चाललेल्या सुरक्षा व्यवस्थेवर तीव्र चिंता व्यक्त केली.





### भारताची जागतिक नेत्यांशी चर्चा

पश्चिम आशियातील संकट ओळखून पंतप्रधान मोदी सातत्याने जागतिक नेत्यांच्या संपर्कात आहेत. शुक्रवारी त्यांनी बहरीनचे राजे हमद बिन ईसा अल खलिफा यांच्याशी चर्चा केली होती. यापूर्वी त्यांनी कतारचे अमीर, जॉर्डनचे राजे आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्याशीही संवाद साधला आहे. "कोणताही वाद हा केवळ संवाद आणि मुत्सद्देगिरीनेच सुटू शकतो," हे भारताचे अधिकृत धोरण असल्याचे सांगितले जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या संवादादरम्यान पश्चिम आशियातील बिघडत चाललेल्या परिस्थितीवर भारताची भूमिका अत्यंत स्पष्टपणे मांडली. त्यांनी प्रामुख्याने प्रादेशिक सुरक्षा, जागतिक व्यापार आणि मानवी हित या तीन गोष्टींवर भर दिला.

पंतप्रधानांनी पश्चिम आशियातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर होणाऱ्या हल्ल्यांचा तीव्र निषेध केला. अशा हल्ल्यांमुळे केवळ प्रादेशिक स्थिरता धोक्यात येत नाही, तर जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत होऊन जगाच्या अर्थव्यवस्थेवरही विपरीत परिणाम होतो, असे त्यांनी नमूद केले. तसेच होर्मुझची सामुद्रधुनी हा समुद्री मार्ग सुरक्षित राहणे अनिवार्य असल्याचे मोदींनी सांगितले. युद्धामुळे होणारी निष्पाप नागरिकांची जीवितहानी आणि मालमत्तेच्या नुकसानीबद्दल पंतप्रधानांनी खोलवर दुःख व्यक्त केले.

या कठीण काळात इराणमधील भारतीय नागरिकांची सुरक्षा आणि त्यांचे हित ही भारताची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे त्यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले.

### वाढता तणाव आणि भारताची भूमिका

एकीकडे अमेरिका आणि इस्रायल इराणमधील सत्तापालटासाठी आक्रमक पवित्रा घेत आहेत, तर दुसरीकडे इराणचे नवीन सर्वोच्च नेते मोजतबा खामेनी यांनी शत्रूंसमोर न झुकण्याची शपथ घेतली आहे. अशा कठीण काळात भारत मध्यस्थाची भूमिका बजावत आहे.



# पुणे विमानतळावरून ५० हजार टनांहून अधिक मालवाहतूक; व्यापाराला मोठी चालना

## देशांतर्गत ४०-५० हजार टन, आंतरराष्ट्रीय १२३ टन कार्गो; उद्योग, ई-कॉमर्स निर्यातीला वेग

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे विमानतळावरून दरमहा सरासरी 10 ते 15 मेट्रिक टन आंतरराष्ट्रीय, तर साडेतीन ते साडेचार हजार मेट्रिक टन देशांतर्गत मालवाहतूक होते. वार्षिक विचार करता, आंतरराष्ट्रीय स्तरावर 123 टन आणि देशांतर्गत 40 ते 50 हजार टन अशी एकूण 50 ते 51 हजार टनांच्या घरात मालवाहतूक येथून यशस्वीपणे पार पडते.**

पुणे विमानतळ फक्त प्रवाशांच्या सेवेसाठीच नाही, तर जागतिक व्यापार आणि मालवाहतुकीचे (कार्गो) महत्त्वाचे केंद्र म्हणून वेगाने पुढे येत आहे. दै. 'पुढारी'च्या प्रतिनिधीने पुणे विमानतळावरील कार्गो विभागाच्या कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी करीत विमानतळावरून होणारी मोठी उलाढाल आणि अत्याधुनिक सुरक्षा



व्यवस्थेचा आढावा घेतला.

विमानतळाच्या कार्गो विभागातून प्रामुख्याने ताजी फळे, भाजीपाला, फुले आणि डे-ओल्ड चिक्स (कोंबड्यांची पिले) यांची मोठ्या प्रमाणात निर्यात होते. यासोबतच टाटा मोटर्स, कॅटरपिलर, कमिन्स, महिंद्रा आणि मर्सडीज यांसारख्या दिग्गज कंपन्यांचे ऑटो पार्ट्स येथून परदेशात पाठवले जातात. ई-कॉमर्स आणि पोस्ट ऑफिस कार्गोची सेवाही आता येथे सुरू झाली आहे.

### विमानतळावरील एकाच दिवसातील मालवाहतूक

अवघ्या 24 तासांतील आकडेवारी पाहता, पुणे विमानतळावर 106.97 मेट्रिक टन माल आला (इनबाऊंड कार्गो), तर 90.14 मेट्रिक टन माल बाहेर (आऊटबाऊंड कार्गो) पाठवण्यात आला. यामध्ये 1,560 किलोग्रॅम आंतरराष्ट्रीय निर्यातीचा समावेश होता.



> पुणे विमानतळ कार्गो क्षमतेचा पूर्ण क्षमतेने वापर करत असून, अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे प्रक्रियेत वेग आला आहे. उद्योजक आणि शेतकऱ्यांसाठी ही व्यवस्था वरदान ठरत आहे. पुण्याच्या वाढत्या विस्तारामुळे कार्गोला पुणेकरांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, आगामी काळात यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.
>
> - **संतोष ढोके, संचालक, पुणे विमानतळ**

### अत्याधुनिक यंत्रणा आणि कडक सुरक्षा

पाहणीत इनबाउंड, आउटबाउंड, इम्पोर्ट आणि एक्स्पोर्ट कार्गो या चारही विभागांतील सुसूत्र कामकाज स्पष्टपणे दिसून आले. माल तपासणीसाठी अत्याधुनिक एक्स-रे स्कॅनर मशिन्स, कुशल मनुष्यबळ आणि जलद वाहतुकीसाठी ट्रॉली वाहनांची सक्षम व्यवस्था करण्यात आली आहे. कस्टम विभाग आणि सुरक्षा यंत्रणांच्या कडक देखरेखीखाली प्रत्येक पार्सलची काटेकोर तपासणी केली जाते.

# मुळशी धरणातून पुण्यासाठी ७ टीएमसी पाणी मंजूर...

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे शहराची पिण्याच्या पाण्याची वाढती गरज लक्षात घेता जलसंपदा विभागाने मुळशी धरणातून सात टीएमसी पाणी घेण्याच्या प्रस्तावाला राज्य सरकारने तसेच टाटा कंपनीने तत्त्वतः मान्यता दिली आहे. हे पाणी नेमके कसे, कधी व कोठे वापरावे, यासंदर्भात जलसंपदा विभागासह टाटा कंपनीचा तज्ज्ञ अधिकाऱ्यांचा एक संयुक्त गट अभ्यास करणार आहे.**

पुढील बैठकीत यासंदर्भात सविस्तर चर्चा होणार आहे. त्यात तांत्रिक मान्यतेबाबत अंतिम निर्णय होणार असल्याचे सूत्रांनी स्पष्ट केले.

पुणे शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता आवश्यक असलेले अतिरिक्त पाणी खडकवासला प्रकल्पातून अपुरे पडत आहे. त्यासाठी मुळशी धरणातून वाया जाणारे पाणी बिगरसिंचनासाठी वापरता येईल, असा पर्याय पुढे आला होता. त्यानुसार मुळशी धरणातून वाया जाणाऱ्या सुमारे सात टीएमसी पाण्याच्या वापरास जलसंपदा विभागाने मान्यता दिली आहे. याचा सविस्तर प्रस्ताव कृष्णा खोरे विकास महामंडळाकडून राज्य सरकारकडे पाठविण्यात आला आहे. यासंदर्भात गेल्या आठवड्यात जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह टाटा कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. या बैठकीला आमदार



राहुल कुल उपस्थित होते.

विखे पाटील यांच्या उपस्थितीत पुढील आठवड्यात आयोजित बैठकीत हा अहवाल सादर करण्यात येणार आहे. त्यात त्या प्रस्तावाला तांत्रिक मान्यता देण्यात येणार आहे. टाटा कंपनी व राज्य सरकारने दिलेल्या मान्यतेनंतर मुळशी धरणातून पुणे शहराला सात टीएमसी पाणी मिळणार, यावर जवळपास शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. त्यानंतर मिळणाऱ्या तांत्रिक मान्यतेनुसार हा प्रकल्प पुढे जाईल, असेही सूत्रांचे म्हणणे आहे.

मुळशी धरणावरून टाटा हायड्रो पावर कंपनीमार्फत भीरा जलविद्युत प्रकल्पासाठी पाणी वापरले जाते. प्रकल्पाचा एकूण जिवंत पाणीसाठा 18.47 टीएमसी इतका आहे, तर मृत साठा 8.12 टीएमसी इतका आहे. या पाण्यातून तीनशे मेगावॅट वीजनिर्मिती करण्यासाठी सहा संच वापरण्यात येत आहेत. मुळशी प्रकल्पाच्या भीरा जलविद्युत केंद्रातील 24 टीएमसी वार्षिक पाणीवापरापैकी जुलै ते सप्टेंबर या तीन महिन्यांत उपलब्ध होणाऱ्या 17 टीएमसी पाण्याद्वारे जास्तीत जास्त वीजनिर्मिती करून उर्वरित सात टीएमसी पाणी वपर 15 ऑक्टोबरनंतरच्या 18.50 टीएमसी पाणीसाठ्यातून आठ महिन्यांमध्ये वीजनिर्मितीसाठी करता येणार आहे. 1.65 टीएमसी बोगदा प्रकल्पासाठी व उर्वरित 9.85 टीएमसीपैकी बाष्पीभवन वजा जाता शिल्लक सात टीएमसी पाणी पूर्वेकडे अर्थात शहरासाठी वळवता येणार आहे.

### राज्य सरकार, टाटाची तत्त्वतः मान्यता

या बैठकीत विखे यांनी याबाबत सकारात्मक भूमिका घेत या प्रस्तावाला तत्त्वतः मान्यता दिली आहे. तसेच, टाटा कंपनीच्या अधिकाऱ्यांनीही सहमती दर्शविली असून, हे पाणी नेमकी कधी, कसे व कोठे वापरायचे, यासंदर्भात अभ्यास गट स्थापन करावा, अशा सूचना विखे यांनी जलसंपदा विभागाला दिल्या होत्या. त्यानुसार टाटा कंपनी आणि जलसंपदा विभागाच्या तज्ज्ञ अधिकाऱ्यांचा एक अभ्यास गट तयार केला असून, यासंदर्भात शास्त्रीय दृष्ट्या अभ्यास करण्यात येत आहे.

# भोसरीत 'बारा विड्यां'तून वर्षाचा अंदाज; शेकडो वर्षांची परंपरा आजही जिवंत...

## भैरवनाथ मंदिरात पंचांगाधारे पावसाचा वेध; ४-५ एप्रिलला भव्य जत्रा, कुस्ती स्पर्धांचा थरार

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**शहरीकरणाच्या वाढत्या लाटेतही परंपरेची घट्ट पकड राखत भोसरीकरांनी आपल्या सांस्कृतिक वारशाचे जतन केले आहे. पाडव्याच्या पूर्वसंध्येला 'बारा मराठी महिन्यांचे बारा विडे' उघडून वर्षभरातील ऋतु, पावसाचे अंदाज आणि वातावरणाचा वेध घेण्याची अनोखी परंपरा यंदाही मोठ्या उत्साहात पार पडली.**



भोसरी गावठाणातील श्री भैरवनाथ मंदिरात झालेल्या बैठकीत गावच्या हेमंत तिखे, माधव तिखे पुरोहितांनी प्रत्येक विडा उघडत पंचांगाच्या आधारे येत्या वर्षाचे संकेत मांडले. ज्वारी, बाजरी, साळी आदी धान्यांनी सजवलेल्या या विड्यांमधून गावाच्या शेती आणि वातावरणाचा अंदाज घेण्याची शेकडो वर्षांची परंपरा आजही तितक्याच श्रद्धेने जपली जात असून यावर्षी मध्यम स्वरूपाचा समाधानकारक शेतीला पूरक असा पाऊस राहणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असल्याचे सांगितले.

याच बैठकीत ४ व ५ एप्रिल रोजी होणाऱ्या ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराजांच्या उत्सवाचे नियोजनही करण्यात आले. मागील वर्षाच्या जत्रेचा आढावा घेत यंदाच्या उत्सवाच्या जबाबदाऱ्या ग्रामस्थांमध्ये वाटप करण्यात आल्या. उत्सवानिमित्त विविध पारंपरिक आणि रोमांचक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळणार आहे. ४ एप्रिल रोजी सकाळी बैलगाडा शर्यती रंगणार असून लाखो रुपयांची बक्षिसे स्पर्धकांना दिली जाणार आहेत. सायंकाळी ढोल-लेझीमच्या गजरात छबिना मिरवणूक निघणार असून त्यानंतर लोकनाट्य तमाशाचा कार्यक्रम रंगणार आहे.

५ एप्रिल रोजी गावजत्रा मैदानात नामांकित पैलवानांच्या कुस्त्यांचा थरार अनुभवता येणार आहे तसेच सकाळी भैरवनाथ मंदिरात चक्रीभजनाने धार्मिक वातावरणाची सुरुवात होणार आहे. परंपरा, श्रद्धा आणि उत्साह यांचा संगम असलेला भोसरीचा भैरवनाथ उत्सव यंदाही मोठ्या दिमाखात साजरा होणार असल्याचे चित्र दिसत आहे.

भोसरी गावठाणातील श्री भैरवनाथ मंदिरात झालेल्या बैठकीत पिंपरी-चिंचवड महापालिकेचे महापौर रवी लांडगे, नितीन लांडगे, सागर गवळी, विराज लांडे, माजी नगरसेवक वसंत लोंढे, पंडित गवळी, विश्वनाथ लांडे, विजय फुगे, महादेव गव्हाणे, माजी नगरसेवक व देवाचे भगत राजेंद्र लांडगे, कामगार नेते सचिन लांडगे तसेच भोसरी उत्सव समितीचे उत्सवप्रमुख जंगल फुगे, माजी नगरसेवक वसंत लोंढे, पंडित गवळी, भानुदास फुगे, गुलाब लांडगे, अशोक लांडगे, अमर लांडगे, राहुल गवळी, राजेंद्र लांडगे आदींनी श्री भैरवनाथ महाराज उत्सवासंबंधी विचार मांडले. मदन गव्हाणे, गणपत गव्हाणे, भानुदास लांडगे, सुदाम माने, विलास फुगे, सम्राट फुगे, किशोर गव्हाणे, अनिल फुगे, नारायण गव्हाणे, विष्णू लांडगे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

### 'बारा विड्यांची' परंपरा काय?

पाडव्याच्या पूर्वसंध्येला बारा मराठी महिन्यांचे प्रतीक म्हणून तयार केलेले बारा विडे उघडून पंचांगाच्या आधारे वर्षभरातील पाऊस, ऋतुस्थिती आणि शेतीचे अंदाज वर्तवण्याची भोसरीतील शेकडो वर्षांची पारंपरिक पद्धत आहे.

# पिंपरी-चिंचवड रुग्णालयांत बिलिंग घोटाळा; लाखोंचा अपहार उघड

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये रुग्णांकडून आकारण्यात येणाऱ्या बिलामध्ये कर्मचाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. बिलावर एक रक्कम आणि कार्बन कॉपीवर वेगळीच रक्कम दाखवत लाखो रुपये लाटले आले आहेत. शहरामध्ये महापालिकेने वैद्यकीय व्यवस्था चांगली देण्यासाठी नवीन रुग्णालयांची स्थापना केली आहे.**

### दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई करणार

आकुर्डी रुग्णालयामध्ये बिलांमध्ये अफरातफर केल्याचे समोर आले आहे. याबाबत वैद्यकीय विभागाकडे माहिती आली असता सर्वच रुग्णालयांची तपासणी केली. त्यामध्ये नवीन भोसरी रुग्णालयामध्येदेखील हा प्रकार घडला आहे. याबाबत चौकशी सुरू केली आहे. त्याचा अहवाल सामान्य प्रशासन विभागाला देण्यात येईल. त्यानंतर महापालिका आस्थापना व कंत्राटी कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जाईल. सर्व रुग्णालयात लवकरच ऑनलाईन व्यवहार सुरू करण्यात येणार आहेत, असे महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितले.

महापालिकेच्या आठ मोठ्या रुग्णालयांसह सुमारे 30 दवाखान्यांमधून शहरातील गोरगरीब रुग्णांवर उपचार केले जातात. त्यासाठी महापालिकेच्या वतीने कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो.

महापालिका कर्मचाऱ्यांकडून गोरगरीब रुग्णांच्या बिलात हात साफ करत आर्थिक गैरव्यवहार केला जात असल्याचे समोर आले आहे. यापूर्वी पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय तसेच, नवीन जिजामाता रुग्णालयामध्ये लिपिकाने आर्थिक गैरव्यवहार केला असल्याचा प्रकार समोर आला होता. त्याच्यावर कारवाई केल्यानंतर देखील इतर रुग्णालयांमध्ये आर्थिक गैरव्यवहार सुरूच आहे. आकुर्डी येथील हभप प्रभाकर मल्हारराव कुटे रुग्णालयामधील गैरव्यवहार समोर आला आहे. रुग्णांना देण्यात येणाऱ्या मूळ बिलावर पूर्ण रक्कम दाखवली जात असताना, त्याच बिलाच्या कार्बन कॉपीवर मात्र कमी रक्कम नोंदवली जात होती.

म्हणजेच प्रत्यक्षात 100 रुपयांचे बिल असताना कार्बन कॉपीवर केवळ 25 रुपये दाखवून उर्वरित रक्कम स्वतःकडे वळवली जात असल्याची बाब समोर आली आहे. अशा प्रकारे दररोज अनेक रुग्णांकडून लहान-लहान रकमेच्या माध्यमातून तब्बल 9 लाखांचा अपहार केला असल्याचे समोर आले आहे. ती बाब रुग्णालय प्रमुखांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी त्याबाबतचा अहवाल वैद्यकीय विभागाला पाठवला. त्यानंतर विभागाने महापालिकेच्या सर्वच रुग्णालयांची तपासणी करण्याचे आदेश दिले. त्यामध्ये नवीन भोसरी रुग्णालयामध्येदेखील अशाच पद्धतीने पैसे लाटल्याचा प्रकार समोर आला आहे. तेथेही लाखो रुपयांच्या अपहार झाला असून, त्याबाबत चौकशी सुरू आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे रुग्णांच्या बिलातही कर्मचार्यांकडून अफरातफर केली जात आहे. त्यामुळे रुग्णांचे आर्थिक शोषण होत असून, महापालिकेची बदनामी होत आहे.

### ऑनलाईन व्यवहार नसल्याने गैरसुविधा

या प्रकारामुळे महापालिकेच्या आरोग्य व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, तातडीने चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

बिलिंग प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी ऑनलाईन डिजिटल पद्धतीचा अवलंब करण्याची गरज आहे. महापालिकेत 1 एप्रिल 2025 पासून पेपरलेस डिजिटल कारभार सुरू आहे. मात्र, रुग्णालयात अद्याप ऑनलाईन बिल तसेच, शुल्क स्वीकारले जात नसल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. रोख रकमेची मागणी केली जात असल्याने कर्मचारी व रुग्णांचे नातेवाईकांमध्ये वारंवार खटके उडत आहेत.



## भूमिका

**जगातला सर्वात आनंदी देश कोणता? आणि जगातला सर्वात दुःखी देश कोणता? या यादीत भारत किंवा आपला देश कुठल्या स्थानावर आहे? ही माहिती जाणून घेण्याची जगभरातील अनेकांना उत्सुकता असते. त्यामुळेच संयुक्त राष्ट्र दरवर्षी जाहीर करीत असलेला 'वर्ल्ड हॅपिनेस रिपोर्ट' आणि त्याच्या निष्कर्षाकडे अनेकांचं लक्ष लागून असतं.**

# युद्धकाळातही इस्रायल आनंदी देशांत 'टॉप टेन'!

सध्याच्या युद्धकालीन परिस्थितीत तर आनंदाची सगळीच परिमाणं बदललेली आहेत. त्यामुळेच अनेकांचं या रिपोर्टकडं लक्ष लागून होतं.

गेली अनेक वर्ष फिनलंड या यादीत पहिल्या स्थानावर आहे. २०२६च्या अहवालातही त्यांनी पुन्हा एकदा अव्वल स्थान पटकावलं आहे. जगातल्या सर्वाधिक आनंदी देशांतील पहिले दहा देश आहेत फिनलंड, आइसलंड, डेन्मार्क, कोस्टा रिका, स्वीडन, नॉर्वे, नेदरलँड, इस्रायल, लक्झेंबर्ग आणि स्वित्झर्लंड. भारत या यादीत ११६व्या क्रमांकावर आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ओढग्रस्तीनं आणि आर्थिक संकटांनी त्रस्त असलेल्या पाकिस्तानचा क्रमांक मात्र भारतापेक्षा वर आहे. असं असलं तरी या अहवालात सर्वाधिक लक्ष वेधून घेतलं ते इस्रायलनं. गेल्या काही वर्षांपासून हा देश संघर्षातून जातो आहे. आधी हमासबरोबर आणि आता इराणबरोबर त्यांचं युद्ध सुरू आहे. तरीही या देशानं जगातल्या 'टॉप टेन' आनंदी देशांमध्ये आपला क्रमांक यंदाही कायम राखला आहे. गेल्या काही वर्षांत इस्रायल सातव्या ते नवव्या क्रमांकाच्या दरम्यान फिरत होता. २०२३ आणि २०२४च्या सुमारास त्याचा क्रमांक आठवा होता. आधीपासूनच तो 'टॉप टेन'मध्ये मजबूतपणे टिकून होता. मात्र यंदाही त्यानं आपली ही जागा कायम ठेवली असल्यानं अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. साहजिकच अनेकांना हा प्रश्न पडला की, सतत संघर्ष, दहशतवादी हल्ले आणि युद्धजन्य परिस्थिती असतानाही एखादा देश 'आनंदी' कसा राहू शकतो?



- याचं उत्तर या अहवालाच्या मोजमापाच्या पद्धतीत दडलं आहे. 'वर्ल्ड हॅपिनेस रिपोर्ट' हा केवळ बाह्य परिस्थिती किंवा युद्धावर आधारित नसतो, तर नागरिकांचं वैयक्तिक समाधान, सामाजिक आधार, सरकारवरचा विश्वास, आरोग्य, आर्थिक स्थिरता आणि जीवनमान यावर तो अवलंबून असतो. इस्रायल गेल्या काही काळापासून मोठ्या आव्हानांना तोंड देत असला तरी तिथली आरोग्यव्यवस्था अत्यंत मजबूत आहे, लोकांचं उत्पन्न उच्च पातळीवर आहे, देशानं तंत्रज्ञान क्षेत्रात प्रचंड प्रगती केली आहे. त्याचबरोबर तिथे सामाजिक एकजूट मोठ्या प्रमाणावर दिसते. संकटाच्या काळात लोक एकमेकांना मदत करतात. आपल्याला काहीही झालं, आपला देश कितीही संकटात असला तरीही आपण एकटे पडणार नाही आणि समाज, सरकार आपल्या पाठीशी उभं राहील हे त्यांना ठाऊक आहे. हीच भावना त्यांच्या आनंदाच्या पातळीला आधार देते. दुसरी महत्त्वाची गोष्ट 'रेझिलिअन्स'- म्हणजेच प्रतिकूल परिस्थितीतून सावरण्याची क्षमता. इस्रायलचे नागरिक अनेक दशकांपासून संघर्षाला सामोरे जात आहेत, त्यामुळे मानसिकदृष्ट्या ते अधिक सक्षम झाले आहेत. म्हणूनच बाह्य संकट आलं तरी त्यांच्या दैनंदिन आयुष्यातील समाधानावर त्याचा तितका परिणाम होत नाही. उलट, संकटात एकजूट वाढते आणि समाज अधिक मजबूत बनतो. याउलट, अनेक विकसित देशांमध्ये आर्थिक प्रगती असूनही सामाजिक एकटेपणा, तणाव आणि सोशल मीडियाचा वाढता प्रभाव यामुळे आनंदाची पातळी घसरताना दिसते.

## प्रासंगिक »

### गर्विष्ठ मेणबत्ती

***एकदा एका गृहस्थाने आपल्या मित्रांना मेजवानीसाठी बोलाविले होते.***

सगळेजण दिवाणखान्यात एका मोठ्या मेणबत्तीच्या प्रकाशात जेवत होते, ते पाहून मेणबत्तीला स्वतःचा अभिमान वाटला, आपल्या प्रकाशाचा केवढा उपयोग आहे असे वाटून ती गर्वाने म्हणाली, "ज्या वेळी व ज्या ठिकाणी सूर्यचंद्राचा प्रकाश पोहोचू शकत नाही.


त्या वेळी व त्या स्थळी माझा प्रकाश पडू शकतो, चंद्रसूर्यही माझ्यापुढेही क्षुद्र वाटतात.' तिचे हे गर्वाचे बोलणे ऐकून जेवणारी मंडळी हसली. त्यातला एक जण उठला. त्याने खिडकी उघडली.

त्याबरोबर हवेची झुळूक आली व मेणबत्ती विझली. नंतर त्याने पुन्हा खिडकी बंद केली व मेणबत्ती पेटविली. मग तो गृहस्थ मेणबत्तीला म्हणाला, 'अगं वेडे आता तरी प्रकाश दे, एवढ्या-शा झुळकेने विझतेस, चंद्रसूर्याला क्षुद्र समजतेस त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ असल्याची मिजास करतेस. चंद्रसूर्य कधी तुझ्यासारखे वाऱ्याच्या झुळकेने विझून गेले आहेत का?'

- तात्पर्य : आपल्यावर सोपवलेली कामगिरी व्यवस्थितपणे पार पाडण्यातच मोठेपण आहे.

आजच्या डिजिटल युगात मोबाईल हा केवळ संवादाचे साधन राहिलेला नाही, तर तो जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनला आहे. विशेषतः 'जेन झी' पिढीमध्ये सोशल मीडियावरील 'रील्स' पाहणे, सतत स्क्रोल करत राहणे आणि रात्री उशिरापर्यंत स्क्रीनसमोर वेळ घालवणे ही सवय झपाट्याने वाढत आहे.

# स्क्रीनसमोरच्या रात्री, 'जेन झी' धोक्याच्या उंबरठ्यावर



मात्र, या सवयीमागील आकर्षण जितके रंगतदार आहे, तितकेच त्याचे परिणाम गंभीर आणि चिंताजनक आहेत.

रात्री उशिरापर्यंत मोबाईल वापरल्यामुळे झोपेचे चक्र पूर्णपणे विस्कळीत होत आहे. स्क्रीनमधून निघणारा ब्लू लाईट शरीरातील 'मेलाटोनिन' या झोप नियंत्रित करणाऱ्या हार्मोनच्या निर्मितीवर परिणाम करतो. परिणामी, गाढ आणि शांत झोप मिळत नाही. मेंदू सतत सक्रिय राहिल्याने शरीराला विश्रांती मिळत नाही आणि दुसऱ्या दिवशी थकवा, चिडचिड, एकाग्रतेचा अभाव अशा समस्या निर्माण होतात.

यापेक्षा गंभीर बाब म्हणजे या सवयींचा मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम. 'डूम स्क्रोलिंग'मुळे मेंदूवर सतत नकारात्मक माहितीचा मारा होतो, ज्यामुळे तणाव, नैराश्य आणि अस्वस्थता वाढते. 'कोर्टिसोल'सारख्या तणाव हार्मोनचे प्रमाण वाढल्याने शरीरावर दीर्घकालीन दुष्परिणाम होऊ शकतात. झोपेची कमतरता ही केवळ थकव्यापुरती मर्यादित नसून, ती हृदयविकार, स्मरणशक्ती कमी होणे आणि रोगप्रतिकारक शक्ती घटणे यांसारख्या गंभीर समस्यांना आमंत्रण देते.

या पार्श्वभूमीवर 'जेन झी'ने स्वतःच्या सवयींकडे सजगतेने पाहण्याची गरज आहे. झोपण्याच्या किमान एक तास आधी मोबाईलचा वापर टाळणे, 'डिजिटल डिटॉक्स'चा अवलंब करणे आणि नियमित झोपेची वेळ पाळणे या साध्या सवयी आरोग्यदायी जीवनासाठी अत्यावश्यक ठरतात. पालक आणि शैक्षणिक संस्था यांचीही येथे महत्त्वाची भूमिका आहे. तरुणांना डिजिटल माध्यमांचा योग्य आणि मर्यादित वापर शिकवणे ही काळाची गरज आहे.

तंत्रज्ञानाचा वापर हा प्रगतीचा मार्ग असला, तरी त्याचा अतिरेक विनाशकारी ठरू शकतो. 'रील्स'च्या मोहात अडकताना आपल्या आरोग्याची किंमत मोजावी लागणार नाही, याची जाणीव प्रत्येकाने ठेवणे गरजेचे आहे. कारण, निरोगी झोप हीच निरोगी जीवनाची पायाभरणी आहे.

## ।। अभंगवाणी ।।



सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती ।
रखुमाईच्या पती सोयरिया ॥१॥

गोड तुझें रूप गोड तुझें नाम ।
देईं मज प्रेम सर्व काळ ॥धृ.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे.
एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# खरातच्या संस्थानला दिलेले पाण्याचे आरक्षण रद्द

## जलसंपदा मंत्री विखे पाटील यांचे आदेश; नराधम अशोक खरातला दणका

**महाईन्यूज** । राहाता

**भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात याच्या सिन्नर तालुक्यातील मिरगाव येथील शिवनिका संस्थानला दारणा प्रकल्पातून पाणी देण्याच्या आदेशाची संपूर्ण चौकशीचे व पाण्याचे आरक्षण तातडीने रद्द करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महाविकास आघाडी सरकारच्या काळात हा निर्णय झाल्यामुळे खरात किती उच्चपदस्थांच्या संपर्कात होता हे सुद्धा आता उघड झाले असल्याची प्रतिक्रिया जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी लोणी येथे शनिवारी माध्यमांशी बोलताना दिली.**



मंत्री विखे यांनी सांगितले की, शिवनिका संस्थानला दिलेले पाण्याचे आरक्षण तात्काळ रद्द करण्याच्या सूचना आपण दिलेल्या आहेत. त्यावेळी हा अध्यादेश का काढण्यात आला, ‘नोटिंग फाईल’वर कोणाच्या सह्या आहेत, याची चौकशी केली जाईल. शिर्डी पोलिस प्रशासनाने दाखविलेल्या तत्परतेमुळेच खरातचे कारनामे उघड झाले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही याची गंभिर दखल घेवून आरोपीला ‘लुकआऊट’ नोटीस काढल्यामुळे खरात कुठेही पळून जावू शकला नाही. या सर्व प्रक्रीयेमध्ये अहिल्यानगरचे पोलिस अधिक्षक, अतिरिक्त पोलिस अधिक्षक आणि पोलिस उपअधिक्षकांसह त्यांच्या सर्व पथकाने अतिशय संयमाने केलेल्या तपासामुळेच यासर्व घटना उघड होवू शकल्या. शिर्डी पोलिसांनी तयार केलेल्या पुराव्यांवरच आता नाशिकचे पोलिस तपास करीत आहेत. पोलिसांच्या कर्तृत्वावर मला शंका नाही, परंतू येवढ्या मोठ्या घटना घडत असताना नाशिकचे पोलिस प्रशासनाच्या नाकाखाली हे प्रकार घडत असताना तिथल्या गुप्तचर यंत्रणा, स्थानिक गुन्हे शाखा काय करत होती, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

### रूपाली चाकणकरांनी पूर्वीच राजीनामा द्यायला हवा होता

महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याचे स्वागत करुन, यापुर्वीच त्यांनी राजीनामा द्यायला पाहीजे होता. आता त्यावर भाष्य करणे उचित नाही, मात्र त्यांनी दिलेला राजीनामा स्वागतार्ह आहे. संशयाचे वातावरण त्यांच्या भोवती निर्माण झाल्यामुळे त्यांनी दिलेला राजीनामा योग्यच आहे, अशी प्रतिक्रीयाही मंत्री विखे यांनी व्यक्त केली.

### त्यावेळी मी मंदिरात नव्हतो बाहेर होतो

समाज माध्यमांमध्ये प्रसारीत झालेल्या छायाचित्राचे स्पष्टीकरण देताना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे म्हणाले की, तत्कालिन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे त्यावेळी शिर्डीमध्ये दर्शनासाठी आले होते. त्यानंतर ईशान्यश्वर मंदिरामध्ये दर्शनासाठी गेले होते. पालकमंत्री या नात्याने मला त्यांच्या दौ-यात बरोबर राहावे लागले. त्यांची पुजा होईपर्यंत मी स्वत: जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलिस अधिक्षकांसमवेत मंदिराबाहेर थांबून होतो. त्यामुळे खरातांशी माझा कुठला संपर्कही नाही. त्याच्या कर्तुत्वाबद्दल मी नंतर कधीतरी बोलेल. मात्र धर्माच्या नावाखाली निरपराध महिलांचे शोषण करणा-या नराधमास ऊशिरा का होईना अटक झाली. यासाठी नेमलेल्या विशेष चौकशी पथकातून अधिक माहिती समोर येईल अशी माहिती मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रसार माध्यमांना दिली.

### संजय राऊत यांना टोला

संजय राऊत यांनी केलेल्या टीकेवर बोलतांना विखे म्हणाले, खरंतर आरोपी पकडला आहे. मात्र विरोधक त्याचे राजकारण करीत आहे. त्यांच्याच काळात त्याला डोक्यावर घेतले गेले, पाणी दिले गेले. आपल्या काळातील पापाचे प्रायश्चित करण्याऐवजी आपले पाप दुसऱ्याच्या गळ्यात घालायला तुम्ही निघालात. खरंतर राउतांकडे अजून काही पुरावे असतील तर ते दिले पाहिजेत. एवढे पाणी तर सोडले होते. याशिवाय अजून काय काय सोडले ते देखील सांगावे, असे आव्हानही विखे यांनी राऊत यांना दिले.

# ज्येष्ठ नव्हे श्रेष्ठांचा सन्मान : तानाजी शिनगारे यांचा गौरव

**महाईन्यूज** । सांगली

**समाजातील ज्येष्ठ नागरिकांचे अनुभव, ज्ञान आणि संस्कार हा अमूल्य ठेवा मानला जातो. “ज्येष्ठ नव्हे श्रेष्ठांचा सन्मान” या भावनेतून नवचैतन्य हास्ययोग परिवार, पुणे यांच्या वतीने समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात येत आहे.**




याच उपक्रमांतर्गत आयोजित आनंद मेळावा २०२६ मध्ये आदर्श शिक्षक व माजी मुख्याध्यापक तानाजी सावळा शिनगारे यांना “ज्येष्ठ नव्हे श्रेष्ठांचा सन्मान” पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान त्यांच्या दीर्घकालीन शिक्षणसेवेचा आणि समाजातील योगदानाचा गौरव करणारा ठरला आहे.

तानाजी शिनगारे यांनी सांगली जिल्ह्यातील हाय्यर एज्युकेशन सोसायटी संचालित शिक्षण संस्थेमध्ये कार्यरत राहून मोलाची सेवा बजावली. मु.पो. सागांव, ता. शिराळा, जि. सांगली येथील समाज विकास माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात त्यांनी अनेक वर्षे कार्य केले. विद्यार्थीप्रिय शिक्षक व मुख्याध्यापक म्हणून त्यांची विशेष ओळख निर्माण झाली आहे. शिनगारे यांनी शिक्षण क्षेत्रात अनेक वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावत हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडवले. शिक्षक म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच दिले नाही, तर संस्कार, शिस्त आणि जीवनात प्रगती करण्याची प्रेरणाही दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला असून, त्यांच्या आयुष्यभराच्या शिक्षणसेवेचा हा योग्य गौरव मानला जात आहे. या सन्मानाबद्दल तानाजी सावळा शिनगारे यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

### विद्यार्थ्यांना घडवण्यामध्ये अमूल्य योगदान

तानाजी सावळा शिनगारे यांचे कार्य केवळ अध्यापनापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर केंद्रित असल्याचे दिसून येते. त्यांनी शिक्षणात ज्ञानासोबतच मूल्यसंस्कार, शिस्त आणि जीवनदृष्टी यांचा समतोल साधत विद्यार्थ्यांना घडवले. त्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेली पिढी केवळ शैक्षणिकदृष्ट्या सक्षम नसून सामाजिकदृष्ट्याही जबाबदार नागरिक म्हणून पुढे आली आहे. त्यांच्या कार्यातून आदर्श शिक्षकाची भूमिका ही समाजघडणीतील महत्त्वाची कडी असल्याचे स्पष्ट होते.

# सौदीत भारतीय तरुणाचा मृत्यू

## पत्नीशी बोलत असतानाच क्षेपणास्त्र पडले, २४ तासांनी मित्राने दिली माहिती

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**मध्य पूर्वेतील युद्धाची भीषण झळ आता भारताच्या ग्रामीण भागापर्यंत पोहोचली आहे. उत्तर प्रदेशातील सीतापूर जिल्ह्यातील बाघैन गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. रोजगारासाठी सौदी अरेबियाला गेलेला २६ वर्षीय रवी गोपाल, याचा रियाधमध्ये झालेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाला. मात्र, या घटनेला काही दिवस उलटूनही रवीचा मृतदेह अद्याप भारतात न परतल्याने त्याचे कुटुंब हतबल झाले असून प्रशासनाच्या संथ कारभारावर संताप व्यक्त करत आहे.**



१८ मार्च रोजी नेहमीप्रमाणे रवी कामावरून परतल्यानंतर रात्री ८:२० च्या सुमारास पत्नी रितूशी फोनवर बोलत होता. दोघांच्या गप्पा सुरू असतानाच, रात्री ९:५३ वाजता अचानक रितूला फोनवर एका प्रचंड स्फोटाचा आवाज ऐकू आला. त्यानंतर काही क्षणातच फोन कट झाला. रितूने वारंवार प्रयत्न करूनही रवीचा फोन लागला नाही. दुसऱ्या दिवशी रवीच्या मित्राने त्याच्या निधनाची धक्कादायक बातमी दिली.

सौदी अरेबियाने दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी रियाधला लक्ष्य करणारी चार इराणी बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे पाडली होती. या क्षेपणास्त्रांचे अवशेष शहराच्या दक्षिणेकडील रिफायनरी जवळ पडले. या पडणाऱ्या अवशेषांच्या तडाख्यात सापडल्याने रवीचा जागीच मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे.

### प्रशासकीय मदतीची प्रतीक्षा

रवीच्या कुटुंबाने आरोप केला आहे की, इतकी मोठी दुर्घटना होऊनही सरकार किंवा संबंधित दूतावासाकडून त्यांना अद्याप कोणतीही ठोस मदत मिळालेली नाही. "आम्ही पोलिसांकडे तक्रार केली आहे, त्यांनी कारवाईचे आश्वासन दिले आहे. पण आम्हाला फक्त आमचा मुलगा शेवटचा पाहायचा आहे. त्याचा मृतदेह भारतात आणण्यासाठी कोणीही ठोस पाऊल उचलताना दिसत नाहीये," अशी भावना रवीच्या वडिलांनी व्यक्त केली.

### कुटुंबाचा एकमेव कमावता सदस्य हरपला

रवी गोपाल हा आपल्या कुटुंबातील एकमेव कमावता सदस्य होता. सप्टेंबर २०२० मध्ये रितूशी त्याचे लग्न झाले होते. त्यानंतर तो उदरनिर्वाहासाठी सौदीला गेला होता. त्याच्या पश्चात वृद्ध आई-वडील, पत्नी आणि एक चार वर्षांचा मुलगा असा परिवार आहे. घराचा आधारस्तंभ गेल्याने हे कुटुंब आता उघड्यावर पडले आहे. त्यामुळे या कुटुंबाला तात्काळ आर्थिक व सामाजिक मदतीची नितांत गरज निर्माण झाली आहे.

### मध्य पूर्वेतील युद्ध आणि भारतीयांवरील संकट

सध्या सुरू असलेल्या मध्य पूर्वेतील संघर्षात आतापर्यंत सहा भारतीयांना आपला जीव गमवावा लागला आहे. १४ मार्च रोजी ओमानमधील सोहार येथे झालेल्या ड्रोन हल्ल्यात दोन भारतीयांचा मृत्यू झाला. एक आठवड्यापूर्वी सौदीतील अल खार्ज येथे क्षेपणास्त्र निवासी भागात पडल्याने एका भारतीयाचा मृत्यू झाला. तर १८ मार्च रोजी रियाधमध्ये रवी गोपालचा मृत्यू झाला. खाडी देशांमध्ये लाखो भारतीय बांधकाम, आरोग्य आणि सेवा क्षेत्रात काम करत आहेत. युद्धाच्या या वाढत्या भीषणतेमुळे तेथे राहणाऱ्या भारतीय मजुरांच्या सुरक्षेचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

# इराणचा हिंद महासागरातल्या बेटावर क्षेपणास्त्र हल्ला

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**गेल्या २० दिवसांपासून इराण–इस्त्रायल–अमेरिका यांच्यात संघर्ष सुरू असून त्यामुळे मध्यपूर्वेत तणाव निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर इराणने नुकताच हिंद महासागरातील एका बेटावर क्षेपणास्त्र हल्ल्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे या संघर्षाची धग आता भारतापर्यंत पोहोचल्याची चर्चा आहे. इराणने हिंद महासागरातील डिएगो गार्सिया येथील अमेरिका–ब्रिटनच्या महत्त्वाच्या लष्करी तळाला लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला.**



मात्र हा हल्ला अयशस्वी ठरल्याचे सांगितले जात आहे. इराणने या बेटावर दोन मध्यम पल्ल्याची बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली.

अमेरिकन अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, एक क्षेपणास्त्र उड्डाणादरम्यानच निकामी झाले, तर दुसरे क्षेपणास्त्र हवेतच नष्ट करण्यात आले. त्यामुळे डिएगो गार्सिया बेटावर कोणतेही नुकसान झाले नाही. इराणची क्षेपणास्त्र क्षमता आणि या तळाचे अंतर लक्षात घेता हा हल्ला अपयशी ठरल्याचे मानले जात आहे.

गेल्या २० दिवसांपासून इराण–इस्त्रायल–अमेरिका यांच्यात संघर्ष सुरू असून त्यामुळे मध्यपूर्वेत तणाव निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर इराणने नुकताच हिंद महासागरातील एका बेटावर क्षेपणास्त्र हल्ल्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे या संघर्षाची धग आता भारतापर्यंत पोहोचल्याची चर्चा आहे. इराणने हिंद महासागरातील डिएगो गार्सिया येथील अमेरिका–ब्रिटनच्या महत्त्वाच्या लष्करी तळाला लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला; मात्र हा हल्ला अयशस्वी ठरल्याचे सांगितले जात आहे. इराणने या बेटावर दोन मध्यम पल्ल्याची बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली.

अमेरिकन अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, एक क्षेपणास्त्र उड्डाणादरम्यानच निकामी झाले, तर दुसरे क्षेपणास्त्र हवेतच नष्ट करण्यात आले. त्यामुळे डिएगो गार्सिया बेटावर कोणतेही नुकसान झाले नाही. इराणची क्षेपणास्त्र क्षमता आणि या तळाचे अंतर लक्षात घेता हा हल्ला अपयशी ठरल्याचे मानले जात आहे.

अमेरिकेला या तळांचा वापर करण्याची परवानगी दिल्यानंतर इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अरागची यांनी ब्रिटनला इशारा दिला होता. "जर ब्रिटनने अमेरिकेला आपल्या लष्करी तळांचा वापर करण्यास परवानगी दिली, तर ते ब्रिटिश नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण करण्यासारखे ठरेल," असे त्यांनी म्हटले होते. या पार्श्वभूमीवर झालेल्या या हल्ल्यामुळे इराण केवळ इशारे देत नाही, तर त्यांची अंमलबजावणीही करतो.

# ट्रॉलर्सना आरतीने दिले सडेतोड उत्तर

टीव्ही अभिनेत्री आरती सिंह तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. सध्या ती पती दीपक चौहानसोबत थायलंडमध्ये सुट्ट्यांचा आनंद घेत असून तिथले फोटो सोशल मीडियावर शेअर करत आहे. तिने इंस्टाग्रामवर बिकिनीमधील काही फोटो शेअर केले होते. या फोटोंवरून सोशल मीडिया यूजर्सनी तिला ट्रोल करण्यास सुरुवात केली. मात्र ट्रोल करणाऱ्यांना आरतीने सडेतोड उत्तर दिले. सुरुवातीला तिने ट्रोलिंगमुळे ते फोटो हटवले होते, पण काही काळानंतर तिने पुन्हा गुलाबी बिकिनीमधील फोटो शेअर करत आपली भूमिका मांडली. तिने पोस्टमध्ये लिहिले की, 'माझं आयुष्य, माझे नियम. माझं शरीर आहे आणि कपडे घालण्याचा निर्णयही माझाच असेल. आपण सतत विचार करतो की लोक काय म्हणतील, पण एक दिवस असा येतो की आपल्याला जाणवतं आपल्याला जे मनापासून करायचं होतं, तेच करायला हवं होतं. ज्यांच्याबद्दल आपण विचार करतो ते आपल्याला ओळखतही नसतात.' मागच्या वेळी जेव्हा मी बिकिनी फोटो पोस्ट केले, तेव्हा काही लोकांनी मला अनफॉलो केलं. त्याचा माझ्यावर परिणाम झाला आणि मी फोटो डिलीट केले. पण काही दिवसांपूर्वी माझी जिवलग मैत्रीण शेफाली हिचं निधन झालं. तेव्हा मला जाणवलं की आयुष्य किती अनिश्चित आहे. आपण जे आपल्याला खरंच आनंद देतं, ते का करू नये?' तिने ट्रोलर्सना उद्देशून स्पष्ट शब्दांत म्हटले, 'मी कोणालाही दुखावत नाही. तुम्हाला माझे फोटो आवडत नसतील तर तुम्ही मला अनफॉलो करू शकता. कमेंटमध्ये काहीही लिहिलं तरी त्यातून तुमचे संस्कार दिसतात. खरोखर प्रेम जे लोक मला करतात ते मला जशी आहे तशी स्वीकारतील.



# श्रृतीची डेट अशी असते!

बॉलिवूड आणि टॉलिवूड चित्रपटांमध्ये काम करणारी अभिनेत्री श्रुती हासन हिची केवळ ज्येष्ठ अभिनेते कमल हासन यांची मुलगी एवढीच ओळख नसून तिने आपल्या दमदार अभिनयाने स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. तिने आजवर अनेक बिग बजेट चित्रपटांमध्ये महत्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. तिचा चाहतावर्ग देखील मोठा आहे. बॉलिवूड आणि टॉलिवूड इंडस्ट्रीतील अनेक दिग्गज अभिनेत्यांसोबत तिने स्क्रिन शेअर केली आहे. ती नेहमी मुलाखतींमध्ये विविध प्रश्नांवर आपले ठाम मत व्यक्त करत असते. तिचे नाव अनेक अभिनेत्यांसोबत जोडले जात आहे. अलीकडील एका मुलाखतीत श्रृतीने याबाबत खुलासा केला आहे. मॅशेबल इंडियाला नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत श्रुती म्हणाली, "माझं प्रेमजीवन खूप जुनं आहे. कधी गाण्यांचं शूटिंग असतं, तर कधी चित्रीकरण. जेव्हा मला ब्रेक मिळतो, तेव्हा समोरच्या व्यक्तीला त्यांचं स्वतःचं आयुष्य जगावं लागतं. बघा, आमच्या इंडस्ट्रीत जवळपास प्रत्येकजण असाच आहे." श्रुती हासनने मुलाखतीत पुढे बोलताना स्पष्ट केले की, जेव्हा ती प्रेमात असते, तेव्हा ती पूर्णपणे घरगुती मुलगी बनते असे ती म्हणाली. "मी माझ्या जोडीदाराला आधी जेवण भरवते, त्याच्यावर प्रेमाचा वर्षाव करते. त्याला ताप आला तर मी त्याची काळजी घेते. पण मी हे सर्व त्या व्यक्तीसाठी करते, जेणेकरून तो माझ्या भावनांना महत्त्व देईल." असे सांगून ती नेमकी कोणला डेट करत आहे, त्याचे नाव गुलदस्त्यात ठेवले आहे. श्रुती हासनच्या कामाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास, श्रुती शेवटची रजनीकांतच्या 'कुली' या चित्रपटात दिसली होती. या वर्षी ती 'ट्रेन' आणि 'सालार 2' सारख्या चित्रपटांमध्ये दिसणार आहे. 'सालार 2' मध्ये ती प्रभासच्या विरुद्ध भूमिकेत झळकेल.



# रॅम्पवर अनन्या पांडेचा जलवा

बॉलिवूड अभिनेत्री अनन्या पांडे पुन्हा एकदा तिच्या स्टाइल आणि फॅशनमुळे चर्चेत आली आहे. मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या एका फॅशन वीकमध्ये अनन्याने रॅम्प वॉक करत प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. तिचा हटके लूक आणि आत्मविश्वासपूर्ण अंदाज सध्या सोशल मीडियावर चांगलाच चर्चेत आहे. या फॅशन शोमध्ये अनन्याने प्रसिद्ध डिझायनर राहुल मिश्रा यांच्या डिझाइनसाठी रॅम्प वॉक केला. यावेळी तिने आयव्हरी रंगाची प्लीटेड स्कर्ट आणि ब्राइट ओव्हरसाईज्ड कोट असा आकर्षक पोशाख परिधान केला होता. या ड्रेसमध्ये ती खूपच सुंदर आणि एलिगंट दिसत होती. अनन्याच्या या लूकमध्ये तिची हेअरस्टाईलही विशेष ठरली. तिने बँग्स स्टाईलमध्ये केस ठेवले होते, ज्यामुळे तिचा लूक आणखी वेगळा आणि स्टायलिश दिसत होता. तिच्या या फॅशन सेन्समुळे उपस्थितांकडून आणि चाहत्यांकडून तिचे भरभरून कौतुक करण्यात आले. रॅम्प वॉकनंतर अनन्याने माध्यमांशी संवाद साधताना तिचा फॅशन मंत्रा सांगितला. ती म्हणाली की, "मला नेहमी आरामदायक आणि क्लासी कपडे घालायला आवडतात." तसेच, तिने राहुल मिश्रा यांच्या डिझाईनचीही प्रशंसा केली. "त्यांच्या प्रत्येक ड्रेसमध्ये एक कथा असते आणि त्या कथेचा भाग बनायला मला आवडतं," असेही ती म्हणाली.




# पाकिस्तानच्या माजी कोचचा गौप्यस्फोट!

## मोहसीन नक्वी यांच्या नेतृत्वात काम करणं अशक्य ; गॅरी कर्स्टन

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे प्रमुख मोहसीन नक्वी यांच्या नेतृत्वात काम करणं निव्वळ अशक्य आहे अशा शब्दात पाकिस्तानचे माजी प्रशिक्षक गॅरी कर्स्टन यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. पाकिस्तानचे प्रशिक्षक म्हणून कर्स्टन यांची नियुक्ती झाली होती मात्र सहा महिन्यात त्यांनी राजीनामा दिला होता.**





कर्स्टन यांनी टॉकस्पोर्ट्सशी बोलताना सांगितलं की, 'पाकिस्तान क्रिकेटमधलं वातावरण विखारी आहे. प्रत्येक कामात हस्तक्षेप केला जातो. व्यावसायिकतेचा अगदीच अभाव आहे. मोहसीन नक्वी यांच्या नेतृत्वात काम करणं आणि संघाला जिंकून देणं जवळपास अशक्य होतं'.

'ज्या गोष्टीने मी सगळ्यात व्यथित झालो ते म्हणजे माझ्या प्रत्येक कामात सातत्याने हस्तक्षेप केला जात असे. मी एक आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू आहे. निवृत्ती घेतल्यानंतर जगभरात अनेक संघांचं प्रशिक्षकपद भूषवलं आहे. कुठेच अशा पद्धतीची कामात ढवळाढवळ पाहिली नाही. जे होतं ते अनाकलनीय होतं'.

'कोचिंग स्टाफला बळीचा बकरा बनवला जात असे. खेळाडूंची मोट बांधून त्यांना जिंकण्यासाठी मार्गदर्शन करणं हे माझं आणि सहकाऱ्यांचं काम होतं. मात्र बाहेर एवढी सुंदोपसुंदी सुरू असताना काम करणं निव्वळ अशक्य होतं. खराब कामगिरी झाल्यावर खेळाडूंवर दंडात्मक कारवाई केली जात असे', असं कर्स्टन यांनी सांगितलं.

'संघाची कामगिरी चांगली झाली नाही तर तुम्ही लक्ष्य होता. प्रशिक्षकांना हटवा किंवा त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करा असा सूर असतो. हे करणं सोपं असतं. मात्र त्याचा वाईट परिणाम होतो. असंच करायचं असेल तर प्रशिक्षकाची गरजच काय? असा सवाल कर्स्टन यांनी केला आहे.

कर्स्टन हे भारतीय संघाचे २००८ ते २०११ या कालावधीत मुख्य प्रशिक्षक होते. त्यांच्या मार्गदर्शनातच भारतीय संघाने २०११ वनडे वर्ल्डकपच्या जेतेपदावर कब्जा केला. २०११ ते २०१३ या काळात त्यांनी दक्षिण आफ्रिका संघाचं प्रशिक्षकपद भूषवलं. त्यांच्या कार्यकाळातच दक्षिण आफ्रिका संघाने कसोटी, वनडे आणि टी२० अशा तिन्ही प्रकारात जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी झेप घेण्याचा मान पटकावला. एप्रिल २०१४ मध्ये पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने कर्स्टन यांची प्रशिक्षकपदी नियुक्ती केली होती. मात्र बोर्ड आणि त्यांच्यात बेबनाव झाल्याने कर्स्टन यांनी सहा महिन्यात राजीनामा दिला. नुकत्याच आटोपलेल्या वर्ल्डकप स्पर्धेत कर्स्टन नामिबिया संघाचे मेन्टॉर म्हणून कार्यरत होते.

कर्स्टन हे भारतीय संघाचे २००८ ते २०११ या कालावधीत मुख्य प्रशिक्षक होते. त्यांच्या मार्गदर्शनातच भारतीय संघाने २०११ वनडे वर्ल्डकपच्या जेतेपदावर कब्जा केला. २०११ ते २०१३ या काळात त्यांनी दक्षिण आफ्रिका संघाचं प्रशिक्षकपद भूषवलं. त्यांच्या कार्यकाळातच दक्षिण आफ्रिका संघाने कसोटी, वनडे आणि टी२० अशा तिन्ही प्रकारात जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी झेप घेण्याचा मान पटकावला. एप्रिल २०१४ मध्ये पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने कर्स्टन यांची प्रशिक्षकपदी नियुक्ती केली होती. मात्र बोर्ड आणि त्यांच्यात बेबनाव झाल्याने कर्स्टन यांनी सहा महिन्यात राजीनामा दिला. नुकत्याच आटोपलेल्या वर्ल्डकप स्पर्धेत कर्स्टन नामिबिया संघाचे मेन्टॉर म्हणून कार्यरत होते.

# विराट कोहली IPL 2026 आधीच RCB संघावर संतापला!

**महाईन्यूज । मुंबई**

**IPL 2026 चा हंगाम सुरू होण्याआधीच विराट कोहलीने ROYAL CHALLENGERS BENGALURU संघाला इशारा दिला आहे की, “एक मिनिटही वाया घालवू नका, पूर्णपणे ‘स्विच ऑन’ व्हा!” बेंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियम येथे झालेल्या पहिल्या सराव सत्रात कोहलीने सहकाऱ्यांना गेल्या हंगामात मिळवलेल्या यशामागच्या मेहनतीची आठवण करून दिली.**



त्यांनी सांगितले की, मागील दोन-तीन वर्षांत संघाने प्रचंड मेहनत घेतली आणि त्याचे फळ म्हणजे विजेतेपद. मात्र आता ही लढाई आणखी कठीण होणार आहे, कारण इतर सर्व संघ RCB ला हरवण्यासाठी पूर्ण ताकदीने मैदानात उतरणार आहेत.

कोहलीने संघातील प्रत्येक खेळाडूला सुरुवातीपासूनच तयारी करण्याचा सल्ला दिला आहे. “हे दिवस वाया घालावू नका. प्रत्येक सराव सत्राचा पूर्ण उपयोग केला पाहिजे. पुढील अडीच महिने आपल्याला 120 टक्के देणं गरजेचं आहे,” असे स्पष्ट शब्दांत त्याने सांगितलं आहे.

RCB आपला पहिला सामना 28 मार्च रोजी SUNRISERS HYDERABAD विरुद्ध याच मैदानावर खेळणार आहे. घरच्या मैदानावर सुरुवात होणार असल्याने संघासाठी ही जमेची बाजू आहे.

यंदाच्या लिलावात RCB ने व्यंकटेश अय्यर, मंगेश यादव, जॉर्डन कॉक्स, विकी ओस्तवाल आणि सात्विक देशवाल यांसारख्या नव्या खेळाडूंना संघात सामील केले आहे. त्यामुळे संघ अधिक संतुलित आणि मजबूत झाला आहे.

संघाचे मुख्य प्रशिक्षक अँडी फ्लॉवर यांनीही संघाच्या तयारीबद्दल समाधान व्यक्त केले आहे. त्यांच्या मते, लिलावानंतर संघातील कमकुवत बाजूंवर काम झाले आहे. “यंदा आमच्या जर्सीवर स्टार आहे, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. पण मागील यश विसरून नव्या आव्हानासाठी सज्ज राहणे गरजेचे आहे,” असे त्यांनी सांगितले. विकेटकीपर फलंदाज जितेश शर्मानेही संघातील वातावरण सकारात्मक असल्याचे सांगितले. नव्या आणि जुन्या खेळाडूंमध्ये चांगली केमिस्ट्री तयार होत असून सराव सत्रांमध्ये उत्साह दिसून येत आहे.

एकूणच, RCB संघ IPL 2026 मध्ये विजेतेपद टिकवण्यासाठी पूर्ण तयारी करत आहे. कोहलीचा आक्रमक आणि प्रेरणादायी मेसेज, नव्या खेळाडूंची भर आणि घरच्या मैदानावर होणारी सुरुवात, या सगळ्यांमुळे RCB पुन्हा एकदा विजेतेपदासाठी प्रबळ दावेदार म्हणून समोर येत आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

ePaper

। रविवार ।
दि. 22 मार्च 2026।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## महापौरांनी घेतला आढावा : वेळेत व गुणवत्तापूर्ण काम पूर्ण करण्याचे दिले निर्देश

# राजमाता जिजाऊ उड्डाणपूल ते गंगोत्री पार्क रस्त्याच्या कामाला गती..!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**भोसरी परिसरातील राजमाता जिजाऊ उड्डाणपूल ते गंगोत्री पार्क या मार्गावरील रस्त्याचा नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी थेट संबंधित आहे. त्यामुळे हे काम गुणवत्तापूर्ण, वेळेत आणि नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे. कामाच्या कालावधीत वाहतुकीस कमीत कमी अडथळा निर्माण होईल यासाठी पोलीस व महापालिका प्रशासनाने समन्वयाने काम करावे, अतिक्रमणावर तात्काळ कारवाई करावी, तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत सर्व विभागांनी जबाबदारीने आपली कामे पार पाडावीत, असे निर्देश महापौर रवि लांडगे यांनी दिले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांनी आज भोसरी येथील प्रभाग क्र. ५ मधील राजमाता जिजाऊ उड्डाणपूल ते गंगोत्री पार्क या दरम्यान सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाची पाहणी केली. या पाहणीदरम्यान त्यांनी संबंधित विभागांना विविध महत्त्वपूर्ण सूचना देत कामाचा सविस्तर आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते.

या पाहणी दरम्यान त्यांचे समवेत नगरसदस्या भिमाबाई फुगे, प्रा. सोनाली गव्हाणे तसेच नगरसदस्य सागर गवळी, जालिंदर शिंदे, विराज लांडे आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते. यांच्यासह क्षेत्रीय अधिकारी तानाजी नरळे, पोलीस निरीक्षक वर्षाराणी पाटील तसेच पाणीपुरवठा, स्थापत्य, शहरी दळणवळण, ड्रेनेज, जलनिस्सारण, नगररचना आदी विभागांचे कार्यकारी अभियंते, उपअभियंते आणि आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पाहणीदरम्यान महापौर यांनी पोलीस प्रशासनास रहदारी कमी करून वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पर्यायी मार्गांची प्रभावी अंमलबजावणी करावी, तसेच नागरिकांना योग्य मार्गदर्शन करण्यात यावे, असेही त्यांनी सांगितले.

महापालिकेच्या स्थापत्य विभागास रस्त्याचे काम विहित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देताना कामाच्या गुणवत्तेशी कोणतीही तडजोड होऊ नये, यावर त्यांनी विशेष भर दिला. शहरी दळणवळण विभागास वाहतूक व्यवस्थापन अधिक कार्यक्षम करण्यासाठी आवश्यक नियोजन करावे, असे निर्देश देण्यात आले. तसेच पाणीपुरवठा, ड्रेनेज व जलनिस्सारण विभागांना रस्त्याच्या कामासोबतच संबंधित पायाभूत सुविधा सुरळीत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. भविष्यात रस्ता पुन्हा उकरावा लागू नये यासाठी सर्व कामे समन्वयाने पूर्ण करावीत, असे त्यांनी स्पष्ट केले. नगररचना विभागास नियोजनबद्ध विकासावर लक्ष केंद्रित करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

आरोग्य विभागास कामाच्या परिसरात स्वच्छता राखणे, कचरा व्यवस्थापन सुरळीत ठेवणे तसेच नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले. याशिवाय रस्त्यालगत असलेल्या अतिक्रमणांवर तातडीने कारवाई करून रस्ता मोकळा ठेवावा, जेणेकरून वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही, असेही महापौरांनी स्पष्ट केले.

पाहणीदरम्यान महापौरांनी प्रभागातील नगरसदस्य व नगरसदस्या यांच्याशीही संवाद साधत स्थानिक समस्या व नागरिकांच्या अपेक्षा जाणून घेतल्या आणि त्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.



“ भोसरी परिसरातील प्रभाग क्र. ५ मधील राजमाता जिजाऊ उड्डाणपूल ते गंगोत्री पार्क या दरम्यान सुरू असलेल्या रस्त्याच्या कामामुळे वाहतुकीस मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत होता. याबाबत स्थानिक नागरिक तसेच नगरसदस्यांकडून हा रस्ता तात्पुरता बंद ठेवावा आणि पर्यायी स्वरूपात एकेरी वाहतूक सुरू ठेवावी, अशी सातत्याने मागणी करण्यात येत होती. या मागणीची दखल घेऊन आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत श्रीराम नवमीपर्यंत सदर रस्ता पूर्णतः बंद ठेवण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. श्रीराम नवमीनंतर कामाच्या प्रगतीनुसार हा रस्ता एकेरी वाहतुकीसाठी टप्प्याटप्प्याने खुला करण्यात येईल, जेणेकरून नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळेल आणि कामही सुरळीत पार पडेल. रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर हा मार्ग पुन्हा दुहेरी वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल. ही उपाययोजना तात्पुरती असली तरी ती नागरिकांच्या सोयी, सुरक्षितता आणि वाहतुकीच्या शिस्तीच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी पोलीस आणि महापालिका प्रशासनाला सहकार्य करून पर्यायी मार्गांचा वापर करावा.

- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# पिंपरी-चिंचवडमध्ये ‘पीएम आवास’चा विस्तार!

## ९ नवीन ठिकाणी उभारली जाणार ६,५०० घरे; हजारो कुटुंबांना घर मिळणार

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**शहरातील बेघर आणि गरजू कुटुंबांसाठी दिलासादायक बातमी आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात ‘प्रधानमंत्री आवास योजने’चा विस्तार करण्यात येणार असून, आणखी नऊ विविध ठिकाणी ही योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत एकूण साडेसहा हजार (६,५००) सदनिकांचे बांधकाम केले जाणार आहे. या महत्त्वाकांक्षी निर्णयामुळे शहरातील तब्बल ६,५०० कुटुंबांचे स्वतःच्या हक्काच्या आणि पक्क्या घराचे स्वप्न साकार होणार आहे.**



वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्यांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने हा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. महापालिकेने पंतप्रधान आवास योजनेत मोशीतील बोऱ्हाडेवाडी, चऱ्होली, पिंपरीतील उद्यमनगर, आकुर्डीतील मोहननगर येथे गृहप्रकल्प उभारला आहे. तेथे एकूण 3 हजार 668 सदनिका आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्ल्यूएस) कुटुंबांना देण्यात आल्या आहेत. तर, डुडुळगाव येथील 1 हजार 190 सदनिकेचा गृहप्रकल्पांच्या इमारत बांधकाम सुरू आहे. न्यायालयात वाद गेल्याने जागा ताब्यात न आल्याने रावेत येथील 934 सदनिकांचा गृहप्रकल्प रद्द करण्यात आला आहे. तेथील लाभार्थ्यांना किवळे येथे सदनिका देण्याची प्रक्रिया सुरू आहे.

रावेत येथील रद्द झालेला गृहप्रकल्प पंतप्रधान आवास योजनेच्या टप्पा दोनमध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. तसेच, मामुर्डी, पुनावळे, वाकड, दिघी, वडमुखवाडी, ताथवडे, रावेत आणि चोविसावाडी असे एकूण नऊ ठिकाणी महापालिकेच्या वतीने दुसऱ्या टप्प्यात ही योजना राबविण्यात येत आहे. महापालिकेने सुधारित विकास योजना आराखड्यात (डीपी प्लान) या आठ ठिकाणच्या जागा आरक्षित केल्या आहेत. त्यापैकी मामुर्डी, पुनावळे, वाकड, दिघी, वडमुखवाडी व रावेत या सहा ठिकाणी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सदनिका असणार आहेत. तर, उर्वरित रावेत, ताथवडे, चोविसावाडी या ती ठिकाणी एचडीएच गटासाठी (बेघरांसाठी घरे) गृहप्रकल्प आहे. रावेत येथे जुना तसेच, नवा असे दोन गृहप्रकल्प होणार आहेत.

या सदनिकांच्या प्रत्यक्ष ताब्यासाठी लाभार्थ्यांना किमान ३ ते ५ वर्षांची प्रतीक्षा करावी लागणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात ‘म्हाडा’साठी काही मोक्याच्या जागा आरक्षित करण्यात आल्या आहेत. या आरक्षित भूखंडांवर भविष्यात आणखी नवनवीन गृहप्रकल्प उभे राहतील, ज्यामुळे सर्वसामान्यांना परवडणाऱ्या किमतीत घरे उपलब्ध होतील, असा विश्वास महापालिका अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

शहरातील या नऊ ठिकाणच्या जागेवर पंतप्रधान आवास योजनेत गृहप्रकल्प राबविण्यात येणार आहेत. त्यासाठी त्या जागा ताब्यात घेऊन भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करण्याबाबत नगर रचना विभागास सूचित करण्यात आले आहे. जागा ताब्यात आल्यानंतर त्या केंद्र व राज्य शासनाची मंजुरी घेऊन निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल. त्यानंतर गृहप्रकल्पासाठी इमारत उभारणीचे काम सुरू केले जाईल, असे महापालिकेचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांनी सांगितले.

### या ठिकाणी होणार

ठिकाण-प्रयोजन-क्षेत्र (हेक्टरमध्ये)
मामुर्डी-ईडब्ल्यूएस-1.44
पुनावळे-ईडब्ल्यूएस-2.00
वाकड-ईडब्ल्यूएस-2.00
दिघी-ईडब्ल्यूएस-1.14
वडमुखवाडी-ईडब्ल्यूएस-2.00
रावेत-ईडब्ल्यूएस-2.00
रावेत-एचडीएच-2.00
ताथवडे-एचडीएच-4.10
चोविसावाडी-एचडीएच-3.59

### नवीन निकषांनुसार होणार वाटप

दुसऱ्या टप्प्यातील गृहप्रकल्पांचे काम पूर्ण झाल्यानंतर, सुधारित नियमांनुसार पात्र लाभार्थ्यांना सदनिकांचे वाटप केले जाणार आहे. पूर्वीच्या तुलनेत आता लाभार्थ्यांना अधिक प्रशस्त घरे मिळणार असून, उत्पन्न मर्यादेत शिथिलता आल्याने मध्यमवर्गीयांनाही या योजनेत सामावून घेणे शक्य होणार आहे. आगामी काळात शहरातील बेघरांचे प्रश्न सोडवण्यासाठी हे गृहप्रकल्प मैलाचा दगड ठरतील, असा विश्वास आयुक्तांनी व्यक्त केला आहे.

### ईडब्ल्यूएससाठी उत्पन्न मर्यादा सहा लाख रुपये

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक म्हणजे ईडब्ल्यूएस होय. पंतप्रधान आवास योजनेत दहा लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरातील ईडब्ल्यूएस वर्गासाठी पूर्वी 3 लाख रुपये उत्पन्नाची मर्यादा होती. ती आता वाढवून 6 लाख रुपये करण्यात आली आहे. आता सहा लाखांपर्यंत उत्पन्न असलेल्या कुटुंबांना पंतप्रधान आवास योजनेत सदनिका खरेदी करता येईल; तसेच, पूर्वी 30 चौरस मीटर (323 चौरस फूट) चटई क्षेत्रफळाच्या (कार्पेट एरिया) सदनिका होत्या. आता त्या 45 चौरस मीटर (484 चौरस फूट) चटई क्षेत्रफळाच्या सदनिका असणार आहेत. शहरातील झोपडपट्टीतील पात्र झोपडीधारकांनाही या योजनेत समाविष्ट करण्यात आले आहे. “प्रधानमंत्री आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात शहरातील जास्तीत जास्त कुटुंबांना लाभ मिळवून देण्याचे पालिकेचे उद्दिष्ट आहे. नवीन निकषांनुसार वाढलेली उत्पन्न मर्यादा, घरांचे वाढीव कार्पेट क्षेत्रफळ आणि झोपडपट्टीवासीयांचा विशेष समावेश यामुळे हजारो नागरिकांना या योजनेचा फायदा होईल.

## ‘क्राईम ब्रँच’चे नाव घेऊन महिलेची ६९ लाखांची फसवणूक; सांगवीतील घटना

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**सांगवी परिसरात सायबर गुन्हेगारांनी स्वतःला सरकारी अधिकाऱ्यांचे भासवून एका महिलेची तब्बल ६९ लाख रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १३ फेब्रुवारी ते १७ मार्च २०२६ या कालावधीत जुनी सांगवी येथील सातपुडा हौसिंग सोसायटी परिसरात राहणाऱ्या महिला फिर्यादीला अज्ञात आरोपींनी संपर्क साधला. आरोपींनी स्वतःला ‘ट्राय डिपार्टमेंट’ व ‘क्राईम ब्रँच अधिकारी’ असल्याचे भासवले.

आरोपींनी फिर्यादीच्या आधार कार्डवर सिम कार्ड काढून त्याद्वारे अश्लील फोटो, व्हिडिओ आणि संदेश प्रसारित केल्याचा बनाव केला. तसेच, फिर्यादीविरुद्ध मनी लॉन्ड्रिंगचा गुन्हा दाखल असून अटकेची कारवाई होऊ शकते, अशी भीती दाखवली.

या दबावाखाली फिर्यादीकडून वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये एकूण ६९ लाख रुपये ऑनलाईन ट्रान्सफर करून घेतल्याचे समोर आले आहे. आरोपींनी ‘सुबोध राव’ असे खोटे नाव सांगत विश्वास संपादन केला.

या प्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३०८, ३१६, ३१८, ३१९ तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(सी), ६६(डी) आणि भादंवि कलम ३८३, ४०६, ४१९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक नांदेकर करत आहेत.

### नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन

पोलीसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणतीही शासकीय यंत्रणा फोनवरून पैसे मागत नाही. अशा प्रकारच्या कॉल्सवर विश्वास ठेवू नये आणि तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा.

# एमआयटी कॉलेज, आळंदी येथे एआय व इंडस्ट्री 4.0 साधनांवरील कार्यशाळा उत्साहात

## उद्योजकता व नवोन्मेषासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन; १३५ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

महाईन्यूज । पुणे

**आळंदी येथील एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये “उद्योजक आणि नवोन्मेषकांसाठी एआय आणि इंडस्ट्री 4.0 टूल्स” या विषयावरील कार्यशाळा उत्साहात पार पडली. इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिल (IIC) आणि स्टुडंट अफेअर्सच्या साय-टेक क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.**



> आजच्या स्पर्धात्मक आणि तंत्रज्ञानप्रधान युगात कृत्रिम बुद्धिमत्ता व इंडस्ट्री 4.0 साधनांचे ज्ञान विद्यार्थ्यांसाठी अत्यावश्यक आहे. अशा कार्यशाळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नवोन्मेषाची जाणीव निर्माण होऊन ते भविष्यात सक्षम उद्योजक व तंत्रज्ञ बनतील.
> - डॉ. बी. बी. वाफारे, संचालक.

कार्यशाळेला डॉ. बी. बी. वाफारे आणि उपसंचालिका डॉ. अक्षदा कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. प्रमुख वक्ते म्हणून सायबर चक्रा टेक्नॉलॉजीचे संस्थापक तथा आयआयटी कानपूर येथे इन्क्युबेट झालेल्या स्टार्टअपचे प्रमुख श्री. अभिषेक वाघमारे उपस्थित होते. ते कावच २०२३ राष्ट्रीय हॅकथॉनचे विजेते तसेच TEDX स्पीकर आहेत.

श्री. वाघमारे यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), इंटरनेट ऑफ थिंग्ज (IOT), ऑटोमेशन आणि उद्योजकता यांचे आजच्या नवोन्मेषप्रधान युगातील महत्त्व स्पष्ट करत त्यांच्या प्रत्यक्ष उपयोजनांवर सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद देत सक्रिय सहभाग नोंदवला. एकूण १३५ विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समन्वयक डॉ. प्रीती भारंबे आणि डॉ. शीतल घोटेकर यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच IIC समन्वयक डॉ. संदीप दावले यांचेही महत्त्वपूर्ण योगदान लाभले. ही कार्यशाळा विद्यार्थ्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाविषयी जागरूकता निर्माण करणारी ठरली असून नवोन्मेष आणि स्टार्टअप संस्कृतीकडे प्रेरित करणारी असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.







# कोयलीत आर्थिक साक्षरतेचा जागर; विद्यार्थ्यांना बचत, डिजिटल व्यवहारांचे मार्गदर्शन

महाईन्यूज । पुणे

**एमआयटी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, आळंदी (देवाची), पुणे यांच्या वतीने उन्नत भारत अभियान (UBA) अंतर्गत कोयली गावातील श्री भानोबा विद्यालय येथे आर्थिक साक्षरता जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक जाणीव वाढविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.**





संस्थेचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. शिरीष शेलके यांच्या सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. इयत्ता ८ वी व ९ वीतील एकूण ६६ विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना बचतीचे महत्त्व, अंदाजपत्रक (बजेट) तयार करण्याची पद्धत, बँकिंग प्रणालीचे महत्त्व तसेच जबाबदारीने खर्च करण्याचे तत्त्व यांविषयी मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय बचत खाते, ठेवी, बँकिंग सेवा यांची माहिती देतानाच डिजिटल पेमेंट प्रणाली, कॅशलेस व्यवहारांचे फायदे आणि सुरक्षित आर्थिक व्यवहार याबाबतही सविस्तर माहिती देण्यात आली.

चार्ट्स, प्रात्यक्षिक साहित्य आणि संवादात्मक अध्यापन पद्धतींचा वापर करून विद्यार्थ्यांना दैनंदिन आर्थिक व्यवस्थापनाची समज सुलभ करण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच योग्य आर्थिक सवयी विकसित करण्यास चालना मिळाली. हा कार्यक्रम डॉ. हनुमंत शिंगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. हनुमंत शिंगाडे (ग्राम समन्वयक – कोयली) आणि डॉ. श्रीराम करगांवकर (UBA समन्वयक) यांनी काम पाहिले. तसेच दिव्या हिवराळे, तुषार भोसले, आदित्य कड आणि वैभव बोऱ्हाटे या विद्यार्थी स्वयंसेवकांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात मोलाचे योगदान दिले.

## विद्यार्थ्यांच्या निर्णय क्षमतेला चालना...

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना लहान वयातच आर्थिक साक्षरतेचे शिक्षण दिल्यास त्यांच्या भविष्यातील आर्थिक निर्णयक्षमता मजबूत होते, ज्यामुळे केवळ वैयक्तिक पातळीवरच नव्हे तर ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या शाश्वत विकासालाही दीर्घकालीन चालना मिळू शकते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक साक्षरतेची जाणीव वाढून जबाबदार आर्थिक वर्तनाची पायाभरणी झाली आहे. तसेच महाविद्यालय आणि ग्रामीण समाज यांच्यातील संबंध अधिक दृढ होण्यास मदत झाली आहे.

# प्लास्टिक वापरणाऱ्या विक्रेत्यांना महापालिकेचा दणका!

## भरारी पथकाची दंडात्मक धडक कारवाई सुरू; ३१ हजारांचा दंड वसूल

**महाईन्यूज । पिंपरी चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'क' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत आरोग्य विभागाकडून प्लास्टिक वापर आणि अस्वच्छतेविरोधात धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत नागरिक व व्यावसायिकांकडून एकूण ३१ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असून प्लास्टिक साहित्यही जप्त करण्यात आले आहे.**




महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, सहा. आयुक्त किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य आरोग्य निरीक्षक वैभव घोळवे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

या मोहिमेत प्रभाग क्रमांक ०८, इंद्रायणी नगर येथे प्लास्टिक वापरणाऱ्या व्यावसायिकांवर कारवाई करत देऊन १० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच ५ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. याच ठिकाणी आरोग्य विघातक कृत्ये, कचरा टाकणे व प्लास्टिक वापर करणाऱ्यांवर कारवाई करत आणखी ८ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

तसेच प्रभाग क्रमांक ०९, नेहरू नगर येथे करण्यात आलेल्या कारवाईत १३ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असून ३ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले.

या संपूर्ण कारवाईचे नेतृत्व मुख्य आरोग्य निरीक्षक वैभव घोळवे, आरोग्य सहाय्यक गीता रिल व जगदीश चिंचोलीकर तसेच, अन्य महापालिका अधिकारी व कर्मचारी यांनी केले.

महापालिकेच्या या कारवाईमुळे प्लास्टिक वापरावर आळा बसण्यास मदत होत असून शहर स्वच्छ व वसुंधरापूरक ठेवण्यासाठी नागरिकांनी नियमांचे पालन करावे, असे मत क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे यांनी यावेळी व्यक्त केले.

> शहरात प्लास्टिक वापर आणि अस्वच्छतेविरोधात महापालिका सातत्याने कठोर कारवाई करत आहे. पर्यावरण संरक्षण आणि नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्लास्टिकमुक्त शहराची संकल्पना राबविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. नागरिकांनी कचरा व्यवस्थापन नियमांचे काटेकोर पालन करून, ओला व सुका कचरा वेगळा करणे, तसेच प्लास्टिकचा वापर टाळणे गरजेचे आहे. सर्वांनी मिळून स्वच्छ, निरोगी आणि शाश्वत शहर घडविण्यासाठी सहकार्य करावे.
>
> - डॉ. प्रदीप ठेंगल, उप आयुक्त, आरोग्य विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

> प्लास्टिक बंदीचे नियम मोडणाऱ्यांवर यापुढेही अशाच प्रकारे कडक कारवाई करण्यात येईल. शहरातील पर्यावरणाचे रक्षण आणि नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही कारवाई अत्यंत आवश्यक आहे. व्यावसायिकांनी वसुंधरापूरक पर्यायांचा अवलंब करून महापालिकेला सहकार्य करावे. नियमांचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाईसोबतच पुढील कठोर पावले उचलली जातील.
>
> - किरणकुमार मोरे, सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.